महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
"कस्तुरी बिल्डीग" तळ मजला, जे.टाटा मार्ग,
पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०००२०

दूरध्वनी क्र:- ०२२-२२८८०१०६/१०७/१०८ email id: aao.prashakosha-mh@gov.in

वाचा :- १. सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दि. २८.०१.२०१६

२. संचालनालयाचे परिपत्रक दि.०३.११.२०२३

क्र.संलेको/प्रशा-कोषा/ कार्या.२/महाकोष-माहितीचा अधिकार / 267 दि. 20 MAR 2025

संचालनालयाचे संकेतस्थळ "महाकोष" वरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(१)(ख) नुसार १७ बाबींची माहिती अद्ययावत करणेबाबत...

## //परिपत्रक//

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २८.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनातील सर्व विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांनी दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै रोजी असे वर्षातून किमान दोन वेळा संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत करावी असे निर्देश आहेत. त्यानुसार संचालनालय व अधिनस्त कार्यालयांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (१) )(ख) मध्ये दर्शविलेल्या १७ बाबींवरील माहिती प्रसिध्द करणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक आहे.

संचालनालयाच्या वाचा क्र.२ वरील परिपत्रकान्वये संचालनालयाच्या महाकोष या संकेतस्थळावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(१)(ख) नुसार १७ बाबींकरिता संचालनालय व अधिनस्त कार्यालयांकरिता TAB उपलब्ध करून देण्यात आले आहेत व त्यानुसार सदर १७ बाबींची माहिती "महाकोष" संकेतस्थळावर UPLOAD करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तरी संकेतस्थळावरील १७ बाबींची माहिती अचूक, वाचनीय व सुस्पष्ट प्रतीमध्ये विहित मुदतीत महाकोष संकेतस्थळावरील "RTI" या दुव्याखाली UPLOAD करण्याची दक्षता संबंधितांनी घ्यावी. सदर माहिती PDF स्वरुपात **helpdeskdat-dat@mah.gov.in** या मेलवर UPLOAD करण्याकरिता PATH नमूद करून उदा. **https://mahakosh.maharashtra.gov.in - RTI - मा.अ. कलम-४ (१) (ख) नुसार १७ बाबींची माहिती- बाब क्रमांक - department wise data - कार्यालयाचे नाव** पाठविण्यात यावी.

कृ.मा.प

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १७ बाबींची माहे जानेवारी-२०२५ ची माहिती महाकोष या संकेतस्थळावर UPLOAD करावयाची कार्यवाही दि. २५.०३.२०२५ पर्यंत करण्यात यावी. तसेच दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै रोजीची माहिती वेळोवेळी अद्ययावत राहिल, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

(वि. तु. पाटील)
**सहसंचालक (कोषागारे),**
**संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई**

प्रति:-

१. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती व नागपूर
२. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
३. उपसंचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई
४. आभासी कोषागार अधिकारी, आभासी कोषागार कार्यालय, मुंबई

२/- वर नमूद सर्व कार्यालयांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयाची व अधिनस्त कार्यालयांची अद्ययावत माहिती RTI या दुव्याखाली UPLOAD करावी.

५. सहायक संचालक (दक्षता व भांडार पडताळणी), मुख्यालय, मुंबई

३/- यांनी बाब क्र.१६ व १७ ची संचालनालयातील जन माहिती अधिकारी यांची नावे, पदनामे व इतर तपशिल या बाबतची अद्ययावत माहिती तयार करुन महाकोषवरील RTI मध्ये UPLOAD करावी.

६. लेखा अधिकारी (रोख), मुख्यालय, मुंबई यांना

४/- यांनी बाब क्र.१ ते १० व बाब क्र १५ ची संचालनालयाची अद्ययावत माहिती महाकोषवरील RTI या दुव्याखाली UPLOAD करावी.

७. लेखा अधिकारी (संगणक), मुख्यालय, मुंबई

५/- यांनी संचालनालय व अधिनस्त कार्यालयांकडून मेलद्वारे प्राप्त माहिती महाकोषवरील RTI दुव्याखाली UPLOAD करावी.

८. सहायक लेखा अधिकारी (अर्थसंकल्प), मुख्यालय, मुंबई

६/- यांनी बाब क्र.११ ची संचालनालयाची अद्ययावत माहिती महाकोषवरील RTI मध्ये UPLOAD करावी.